

## 'मेट्रो-३ पुढील वर्षअखेरीपर्यंत'

मुंबई : आरे कारशेडच्या वादामुळे रखडलेली कुलाबा ते सीप्झ ही मेट्रो-३ पुढील वर्षाच्या अखेरीस मुंबईकरांच्या सेवेत दाखल होईल. यामुळे मुंबईकरांच्या सार्वजनिक वाहतूक सुविधेत आमूलाग्र बदल होईल. शिवाय मुंबईच्या पर्यावरण रक्षणात कमालीची मदत होईल. यापुढे आरे कारशेडसाठी एकही झाड कापले जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधान परिषदेत विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना दिली. ➤ वृत्त...५

# 'मेट्रो-3 वर्षभरात'

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत ग्वाही

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

मुंबईतील आरे कारशेडच्या वादामुळे रखडलेली कुलाबा ते सीप्झ ही मेट्रो-३ पुढील वर्षाच्या अखेरीस मुंबईकरांच्या सेवेत दाखल होईल. यामुळे मुंबईकरांच्या सार्वजनिक वाहतूक सुविधेत आमूलाग्र बदल होईल. शिवाय मुंबईच्या पर्यावरण रक्षणात कमालीची मदत होईल. यापुढे आरे कारशेडसाठी एकही झाड कापले जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधान परिषदेत विरोधकांच्या अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना दिली. महाविकास आघाडी सरकारने गृहखात्याचा खेळखंडोबा केला असा आरोपही त्यांनी केला.

मेट्रोच्या आरे कारशेडबाबत माझा दुराग्रह कधीच नव्हता व नाही. मेट्रोचा २० हजार कोटी रुपयांचा प्रकल्प केवळ ४०० कोटींच्या कारशेडच्या वादामुळे जास्त काळ रखडणे मुंबईच्या हिताचे नाही. प्रकल्प रखडल्यामुळे प्रकल्पाची किंमत १० हजार कोटींपेक्षा अधिक वाढली आहे. या प्रश्नावर पर्यावरणवाद्यांशी चर्चा करण्याची माझी तयारी आहे. या प्रकल्पासाठी यापुढे एकही झाड कापायचे नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले. मेट्रो कारशेडबाबत न्यायालयातही आमचे म्हणणे टिकले, रात्रीच्या वेळी झाडे कापली गेली ही चूक असल्याचे मान्य करतो व त्याबद्दल माफी मागतो असेही ते म्हणाले.

बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे महाराष्ट्रात ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. यामुळे राज्याचा विकासदर वाढण्यास मोठी मदत होईल. सुमारे १ लाख कोटी रुपयांच्या बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी महाराष्ट्राला ५ हजार कोटी रुपये हिस्सा द्यायचा आहे. बुलेट ट्रेनसाठी बीकेसीतील जमीन देण्यात आली आहे. मात्र इथे ४ मजले जमिनीखालील जागा वापरली जाणार आहे. वरच्या जागेचा आपल्याला वापर करता येणार असल्याचे ते म्हणाले.



### १२०० किमी रस्त्यांचे काँक्रिटीकरण

मुंबईतील खड्डे हा एक गंभीर विषय आहे. त्यामुळे मुंबईतील १२०० किलोमीटरचे डांबरी रस्त्यांचे पुढील तीन वर्षांत काँक्रिटीकरण करणार आहोत. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये राज्यातील रस्त्यांवरील खड्डे भरण्यात येतील. ठाण्यातील कळवा पुलाजवळ पाच ठिकाणचे रस्ते एकत्र येतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी होते. त्यावर मार्ग काढण्यासाठी तिथे नव्या उड्डाणपुलाचे बांधकाम केले जाणार असल्याची माहितीही फडणवीस यांनी दिली.




महाराष्ट्र आणि मुंबई पोलिस दल हे देशातील क्रमांक एकचे म्हणून ओळखले जात होते. मात्र मागील अडीच वर्षांत या पोलिस दलाची बदनामी झाली आहे. या राज्यातील वरिष्ठ पोलिस अधिकारी दिल्ली किंवा इतर राज्यात गेले तर त्यांच्याकडे संशयाने बघितले जाते, असा दावा करत महाविकास आघाडी सरकारने गृहविभागाचा खेळखंडोबा केला, असा आरोप त्यांनी केला. मुंबई पोलिस दलातील वाझे प्रकरण, गृहमंत्र्यांना तुरुंगामध्ये जावे लागणे, पोलिस आयुक्त म्हणून ज्यांना आणले त्यांच्याकडून नियमबाह्य कामे करून घेणे असे प्रकार घडले. पोलिस बदल्यातील भ्रष्टाचार, मालेगाव आणि अमरावती दंगली, परीक्षा घोटाळा, राजकीय कार्यकर्त्यांच्या हत्या, पालघरमधील हत्या अशा अनेक घटना या काळात घडल्याचे फडणवीस यांनी निदर्शनास आणून दिले.

उच्चभ्रू पार्ट्यांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे अमली पदार्थ वापरले जात आहेत, तरुण पिढीत अमली पदार्थांचे आकर्षण वाढत आहे. यासाठी कॉलेजच्या विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.